मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
सायबर गुन्हे कक्ष
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट :-१०९/२०२२ दिनांक – १८/०४/२०२२

# UPI Payment फसवणुकीबाबत घ्यावयाची काळजी....

आजच्या इंटरनेटच्या जगाता अनेक कामे ऑनलाईन होते. त्यात ऑनलाईन पेमेंट्स ही मोठया प्रमाणात केले जाते. युपीआय पेमेंट (**UPI Payment**) कोठेही पैसे पाठविण्यासाठी, पैसे मिळविण्यासाठीचा सर्वात सोपा पर्याय आहे. भाजी दुकानदार ते गोल्ड शॉपपर्यंत सर्व ठिकाणी याचा मोठया प्रमाणात वापर केला जातो. पण **UPI Payment** चा वापर करताना अतिशय सावधपणे वापर करणं गरजेचं आहे. अन्यथा एक चूक तुमच मोठं नुकसान करु शकते.

**अशा प्रकारचे पेमेंट करताना घ्यावयाची काळजी :-**

- **युपीआय पेमेंट (UPI Payment) करताना तुम्ही कोणाला पैसे पाठवता याची खात्री करा.**
- **मेल किंवा फोन नंबरवरुन पैसे पाठवताना आधी त्याची माहीती घ्या. अनेकदा मेल्समध्ये आलेले फोन नंबर्स तुमचे डिटेल्स चोरी करण्याचा एक मार्ग असतो.**
- **पैसे रिसीव्ह करण्यासाठी कोणी तुमचा युपीआय पिन (UPI PIN) विचारत असेल, तर तो सांगू नका. पैसे रिसीव्ह करण्यासाठी बँक कधीही युपीआय पिन (UPI PIN) टाकण्यासाठी सांगत नाही. केवळ पैसे पाठविताना पीन (PIN) टाकावा लागतो.**
- **अनेकदा QR CODE द्वारे पैसे पाठवितानाही मोठे फ्रॉड होतात. फ्राडस्टर्स युजरला ओळखीच्या नावाने किंवा इतर कोणत्याही कारणाने पैसे पाठवायचे असल्याचे सांगतात. त्यासाठी युजरला QR CODE पाठवितात आणि तो स्कॅन करण्यासाठी सांगतात. युजरने हा कोड स्कॅन केला तर अकाऊंटमधून पैसे चोरी होण्याचा मोठा धोका असतो.**
- **"रिटायमेंट नंतर दर महीना २२०००/- रुपये, लॉटरी, फ्री फुड" असे अनोळखी नोटीफीकेशन अथवा कोणताही कोड स्कॅन करु नका याद्वारे तुमच्या मोबाईलमधील पर्सनल माहीती, डेटा, बँक अकाऊंटची माहीती फ्रॉडस्टर्स कडे जाण्याची शक्यता असते.**
- **कोणत्याही प्रकारचे ॲप वापरण्यापुर्वी त्याबाबत सर्व माहीती तपासून पहावी. आणि कोणतेही ॲप डाऊनलोड करताना खात्रीशीर प्लॅटफॉर्मवरुनच डाऊनलोड करावे.**

तरी मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच **www.cybercrime.gov.in** अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

-----oooo----